॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.५ (प्रतिनिधी) : बँका, वित्तीय सेवा तसेच उद्योगजगतात आवश्यक असणारी कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेवून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय) आणि भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (ऑनर्स ) इलेक्ट्रॉनिक्स हे दोन नाविन्यपूर्ण चारवर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु केले असून त्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स अ‍ॅण्ड पॉलिसी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सुरु होणाऱ्या या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाची (**अ‍ॅप्रेंटिसशि**) संधी मिळणार आहे.

सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स अ‍ॅण्ड पॉलिसी ही एक संस्था असून गेल्या तीन दशकांपेक्षा अधिककाळापासून काही नागरी सनदी अधिकारी या संस्थेच्या माध्यमातून शासनाला चांगल्या योजना आणि धोरणांची रचना, पुनर्रचना व अंमलबजावणी यासाठी मदत करत असते. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने काही नाविन्यपूर्ण व रोजगाराभिमूख अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत या करारात समावेश करण्यात आला. त्यानुसार काही अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. त्यासाठी विद्यापीठांकडून व स्वायत्त महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दोन नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

हे दोन्ही अभ्यासक्रम रोजगाराभिमुख आहेत. **अ‍ॅप्रेंटिसशि** एम्बेडेड असे हे अभ्यासक्रम असून यामध्ये विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणार्थी संधी मिळेल व त्याचा योग्य तो मोबदला देखील दिला जाणार आहे. तसेच बँका, वित्तीय संस्था आणि विमा कंपन्या यामध्ये कौशल्यप्राप्त असलेल्या मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेवून विद्यापीठाने बी.कॉम. (बीएफएसआय – बँकींग, फायनान्स सर्व्हिसेस अ‍ॅण्ड इन्शुरन्स) हा चारवर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या नेतृत्वाखाली नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने महाराष्ट्रात आघाडी घेतली आहे. त्याचाच एक भाग म्हणून गतवर्षी बी.एस्सी. (काम्प्युटर सायन्स), बी.एस्सी. (मॅथेमॅटिकल सायन्स) आणि बी.ए. (सोशल सायन्स) हे तीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

नव्या शैक्षणिक वर्षात आता दोन नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत बी.कॉम. हा पदवी अभ्यासक्रम सुरु होणार असून यामध्ये मुख्य विषय (मेजर) बँकींग / फायनान्शियल सर्व्हिस / इन्शुरन्स आणि उपविषय (मायनर) इकॉनॉमिक्स / डाटासायन्स हे राहणार आहेत. सेंटर फॉर रिसर्च इन स्किम्स अ‍ॅण्ड पॉलिसी आणि बीएफएसआय सेक्टर स्कील कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या सहयोगाने हा अभ्यासक्रम सुरु होत आहे. विद्यार्थ्यांना बँकींग आणि वित्तीय क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार कौशल्य प्राप्त करण्यासाठी सक्षम करणे, आर्थिक सेवांमध्ये उद्योजकीय क्षमता वाढविणे यावर अभ्यासक्रमात भर देण्यात आला आहे. चार वर्षांचा हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बी.कॉम. (ऑनर्स) (बीएफएसआय) ही पदवी विद्यार्थ्याला दिली जाईल. त्या आधी आवश्यक ते क्रेडीट पूर्ण केल्यास पहिल्या वर्षी प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षी पदविका प्रमाणपत्र आणि तिसऱ्या वर्षी पदवी दिली जाणार आहे. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना एकाधिक प्रवेश व बाहेर पडण्याचे पर्याय उपलब्ध राहतील. **अ‍ॅप्रेन्टिसशि** पूर्ण

## जनसंपर्क विभाग

केल्यानंतर प्रमाणपत्र दिले जाईल.१२वी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी अथवा १२वी एमसीव्हीसी किंवा अभियांत्रिकी / फार्मसी डिप्लोमा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र आहे.

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळे बी.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स (ऑनर्स) हा नवीन अभ्यासक्रम सुरु होत आहे. यामध्ये मुख्य विषय (मेजर) इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स आणि उप विषय (मायनर) सोलार फोटोव्होल्टाईक सिस्टीम्स किंवा डाटा सायन्स हे राहणार आहेत. इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्कील कौन्सील ऑफ इंडिया आणि सेंटर फॉर रिसर्च इन स्किम्स ॲण्ड पॉलिसीच्या सहयोगाने हा अभ्यासक्रम सुरु होत आहे. उद्योगाभिमुख असा हा अभ्यासक्रम असून एक वर्ष पूर्ण वेळ शिकाऊ उमेदवारी करावी लागणार असून इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्कील कौन्सील ऑफ इंडियाकडून **ॲप्रेन्टिसशि** पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिले जाईल. या अभ्यासक्रमातही आवश्यक असलेले क्रेडीट पूर्ण केल्यानंतर पहिल्या वर्षी प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षी इलेक्ट्रॉनिक्स पदविका प्रमाणपत्र आणि तिसऱ्या वर्षी पदवी दिली जाणार आहे तर चौथ्या वर्षी बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स)ऑनर्स या विषयाची पदवी प्राप्त होईल. इलेक्ट्रॉनिक्स, सोलार फोटोव्होल्टाईक सिस्टीम्स किंवा डाटा सायन्स या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होणार आहेत. १२वी विज्ञान उत्तीर्ण झालेला अथवा इलेक्ट्रॉनिक्स / इलेक्ट्रीकल विषयातील डिप्लोमाधारक विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र आहे.

या दोन्ही अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून विद्यापीठाच्या www:nmu.ac.in या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती व प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

..............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ५ जून, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी